# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २२८-२३** **दिनांक :- १५/०७/२०२३**

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिमंडळ ०१, मिरारोड कार्यक्षेत्रातील विविध पोलीस ठाण्यांत दाखल असलेल्या गुन्हयातील १,८६,३८,५७०/- रुपयांचा हस्तगत मुद्देमाल पिडीत व फिर्यादी यांना मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते परत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-१ कार्यक्षेत्रातील पोलीस ठाण्यांमध्ये सन २०२२ व २०२३ मध्ये दाखल असलेले चोरी, जबरी चोरी, घरफोडी तसेच इतर गंभीर गुन्ह्यांचा पोलीसांनी कौशल्यपुर्वक तपास करुन त्याची उकल करुन चोरीस गेलेल्या किंमती ऐवज, रोख रक्कम, मोटार सायकल, ॲटो रिक्षा, मोबाईल हॅन्डसेट असा एकूण *१,८६,३८,५७०/-* रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला होता.

मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय यांच्या हस्ते आज दिनांक १५/०७/२०२३ रोजी सायं. ०५.०० वाजताच्या दरम्यान मॅक्सेस मॉल, भाईंदर (पश्चिम) येथे घेण्यात आलेल्या मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रमादरम्यान फिर्यादी व पिडीत यांना कायदेशीर बाबींची पुर्तता करुन सदरचा हस्तगत मुद्देमाल परत मिळवून दिल्याने संबंधित पिडीत व फिर्यादी यांनी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीसांचे आभार मानून आनंद व्यक्त केला आहे.

सदर मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रमासाठी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मिरारोड, श्रीमती दिपाली खन्ना, सहायक पोलीस आयुक्त, भाईंदर विभाग, श्री. उमेश माने, सहायक पोलीस आयुक्त, नवघर विभाग, श्री. महेश तरडे, सहायक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, श्री. संदीप कदम, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, काशिमीरा पोलीस ठाणे, श्री. विजयसिंह बागल, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, मिरारोड पोलीस ठाणे, श्री. मुगुटलाल पाटील, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, भाईंदर पोलीस ठाणे, श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, नयानगर पोलीस ठाणे, श्री. दादाराम करांडे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, उत्तन पो.ठाणे, पो.नि. श्री. सुशीलकुमार शिंदे (गुन्हे), नवघर पोलीस ठाणे, इतर पोलीस अधिकारी/अंमलदार व नागरिक उपस्थित होते.




**-----0000------**